स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक 15–12–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 9. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 12. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 13. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 14. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 15. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उप निगम आयुक्त

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 225</u> :– प्रभाग क्र. 53 'ब' येथील नविन फुटाळा वस्तीच्या टेकडीला रिटेनिंग वॉल बांधकाम या कामाकरिता मे. एस. के इंटरप्राईस यांची न्युनतम दरावरील रु.42,91,477/– ची प्राकलनीय राशीपेक्षा 14.11 टक्के कमी दराची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 226</u> :– स्थायी समिती ठराव क्र.161 दि.31.10.2012 अन्वये रुपये 30,17,000/–च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी नुसार नागपूर शहरातील वाहतुक सिग्नल असलेले चौरस्त्यांवर पेडेस्ट्रीयन क्रॉसींग इत्यादी हॉट अप्लाईड थर्मोप्लास्टीक मटेरीयल नी आखण्याकरीता मॅन्युफॅक्चर्स किंवा ॲथोराईझड डिलर कडून प्राप्त मे. एम.एस.भांडारकर यांची 17.86 टक्केनी कमी दराची रुपये 24,78,164/–ची निविदेला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 227</u> :– शासकीय मेडीकल कॉलेज परिसर येथे सार्वजनिक शौचालयाचे (सुलभ शौचालय) बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 22,85,976/– च्या प्राकलनास ठराव क्र. 78, दि. 19.09.2011 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली असुन याच कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. रुपये 33,56,009/–च्या सुधारित प्राकलनास व सदर काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस या संस्थेकडुन बिना अग्रीम उर्वरित काम पूर्ण करुन घेणे व प्रत्यक्ष या कामाचे अंतीम देयकानुसार अग्रीमाचे भुगतान करण्याच्या अटीवर काम करुन घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 228</u> :– नरेन्द्रनगर फायर स्टेशन परिसर, रिंग रोड येथे सार्वजनिक शौचालयाचे (सुलभ शौचालय) बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 14,91,902/– च्या प्राकलनास ठराव क्र. 425, दि. 02.03.2010 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली असुन याच कामाकरिता तयार करण्यात आलेल्या सुधारित रु. 20,46,598/– च्या प्राकलनास व सदर काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस या संस्थेकडून बिना अग्रीम उर्वरित काम पूर्ण करुन घेणे व प्रत्यक्ष या कामाचे अंतीम देयकानुसार अग्रीमाचे भुगतान करण्याच्या अटीवर काम करुन घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 229</u> :– प्रभाग क्र. 66, रामेश्वरी येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रु. 26,99,740/– च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 230</u> :— प्रभाग क्र.66''अ''येथील पार्वतीनगर मधील श्री.उईके यांच्या घरापासुन ते धुर्वे वाचनालय तसेच राज ड्रायक्लिनर ते श्री. कुरेशी यांच्या घरापर्यंन्त रस्त्याचे डांबरीकरण व इंटरलॉकींग ब्लॉक बसविण्याचा कामास्तव रु. 29,91,185/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 231</u> :— प्रभाग क्र.72 येथील जयताळा जकात नाका ते एकात्मता नगर पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 36,35,135/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 232</u> :— प्रभाग क्र. 72 येथील संघर्षनगर ते कबीरनगर पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचा कामास्तव रु. 25,59,534/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 233</u> :— म.न.पा. संचालित दत्तात्रयनगर माध्यमिक शाळा भाडयाच्या इमारतीत असुन उपअभियंता, नेहरुनगर झोन क्र. 5 म.न. पा. यांनी केलेल्या भाडे पुनर्निधारण नुसार इमारत भाडे प्रतिमाह रु. 11,985/— ऐवजी रु. 27,049/— करण्याचे मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री.सतीश होलेः— मा. अध्यक्ष महोदय, महापालिकेच्या किती शाळा किरायाच्या इमारतीत आहेत आणि किरायाच्या इमारतीत असलेल्या शाळेचा किराया वाढविण्यात आला काय? खाजगी जागेवर असलेल्या जागेचे भाडे वाढवितो. ज्यां अप्रोच होतात त्या खाजगी जागेवरील इमारतीचे भाडे वाढविले जाते परंतु काही इमारतीचे भाडे मात्र वाढविण्यात येत नाही. अशा किती इमारती आहेत. किती लोकांचे अर्ज आलेले नाहीत आणि अशा किती शाळा आहे त्यांचे भाडे रिवाईज झालेले नाही. कार्यालयाने याची माहिति दयावी.

श्री.डोंगरवार(शिक्षणाधिकारी):—मा. अध्यक्ष महोदय,ज्यांचे अर्ज आलेले आहेत त्यांचे भाडे वाढविले आहे. 39 शाळा खाजगी इमारतीत किरायाने घेतलेल्या आहेत.

अध्यक्षः— या विषयावर विभागाचे मत यासाठी मागितले की, सहारिया साहेब महापालिकेच्या विशेष सभेसाठी आले होते. त्यावेळी मी एक विषय मांडला होता. नागपूर शहरात जेथे कुठे एनआयटीची जागा आहे ती जागा राज्य सरकारने महापालिकेच्या शाळेकरिता हस्तांतरीत करण्याकरिता निर्णय द्यावा हा प्रस्ताव मांडला होता आणि त्या जागा फुकटात देण्यात याव्या. त्यादृष्टीने प्रस्ताव पाठविला आहे. नागपूर शहरात असेंम्बली सुरू आहे, 39 शाळा खाजगी जागेत चालतात. त्या पैकी 20—25 जागा जरी मिळाल्या तर बरे होईल. संजय नगर शाळेला जागा नाही यादृष्टीने पाठपुरावा करण्यात यावा. या कामाचा फॉलोअप घेण्याकरिता एक व्यक्ति नेमुन देण्यात यावा. रिझर्वेशनच्या जागा मिळविण्याकरिता एडीटीपीकडून एका व्यक्तिची नेमणुक करण्यात यावी. म.न.पा. च्या शाळेकरिता जागा मिळाल्या तर शाळेची सुध्दा पटसंख्या वाढणार.

श्रीमती अल्का दलालः— मा.अध्यक्ष महोदय, टेका नाका येथे एक किरायाच्या इमारतीत शाळा भरते त्याच्या अर्ध्या कि.मी.वर बंद पडलेली म.न.पा.ची शाळा आहे. तीच शाळा व्यवस्थित केली तर महापालिकेचे पैसे वाचणार. अश्याच प्रकारे पारडी येथे मातामंदीर त्याच्या अलीकडची जागेत शाळा आहे.

श्री.हजारेः— मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागात चार—पाच लेआऊट असे आहेत जेथे रिझर्वेशनमध्ये जागा ठेवलेल्या आहेत. तसेच काही सरकारी विभागाच्या जागा आहेत त्यावर सोसायटी टाकलेल्या आहेत. मी आठ दिवसापूर्वी जे.ई. घेवून जागेची पाहणी केलेली आहे. जे.ई. याबाबतचा प्रस्ताव पाठविणार आहे. लेआऊट परिसरात ओपन स्पेस आहेत आणि काही शाळेसाठी रिझर्वेशन ठेवलेले आहे. हा विषय करणे खुप जरूरीचे आहे. कारण शाळेच्या इमारतीच्या 25 फुटावर रेल्वे लाईन असून ट्रेन जात असते. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ते खुप आवश्यक आहे. या शाळेत चपराशी सुध्दा दिलेला नाही. जो चपराशी होता तो सुध्दा काढण्यात आला आहे.

अध्यक्षः— डोंगरवार साहेबांनी माहिती द्यावी. शाळेचे चपराशी कां काढण्यात आले आहेत.

श्री.डोंगरवार(शिक्षणाधिकारी):—मा. अध्यक्ष महोदय, 100 खाजगी लावलेले व्यक्ति काढले आहे अशी माहिती आहे.

श्री.सतिश होलेः– मा.अध्यक्ष महोदय, 30 तारखेपासून कंत्राट पध्दतीवर जे काही ड्रायव्हर लावले होते. त्याला तीन महिने वाढ होती ते आतापर्यंत काम करीत होते. त्यातील काही ड्रायव्हरने फायरची ट्रेनिंग सुध्दा केलेली आहे. त्यांची एकदम आर्डर कॅन्सल करून एजन्सी नेमण्याच्या संदर्भात कार्यालयाचा विचार सुरू आहे.

श्री.उचके( अधिकारी):–मा. अध्यक्ष महोदय, कंत्राट पध्दतीने 8 ड्रायव्हर कार्यरत होते. चार महिन्यापासून अकरा–अकरा महिन्याने आर्डर देत होते. प्रशासनाचे असे मत पडले की हे कार्यरत ड्रायव्हर नंतर स्थायी सेवेची मागणी करतील. त्यांची कोणतीही चाचणी न करता त्याला रिनीव्हल करीत आले आहेत. फायरची ट्रेनिंग त्यांच्या पोस्टकरिता अट टाकण्यात आली नव्हती.

श्री.सतीश होलेः– मा.अध्यक्ष महोदय, या ड्रायव्हरच्या हाताने चार महिन्यात एकही अपघात झालेला नाही. त्यांची कोणत्याही प्रकारची अडचण नसतांना त्यांना एकदम कां काढण्यात आले.

श्री.उचके( अधिकारी):–मा. अध्यक्ष महोदय, विभागात 25 ड्रायव्हरच्या जागा रिक्त आहेत. म्हणजेच आणखी 50 ड्रायव्हर लागणार आहेत. नवीन येणा–या एजन्सीला यांना कामावर ठेवण्याबद्दल सांगता येईल.

श्री.सतीश होलेः– मा.अध्यक्ष महोदय, ड्रायव्हर कमी करण्याच्या संदर्भात बोलत आहे. येथे कोणत्याही एजन्सीची गरज नाही. जाहिरात देवून त्यांचे इन्टरव्हयु घेतल्यानंतर या ड्रायव्हरला घेतले होते. नवीन येणारी एजन्सी यांना कामावर घेणार याची काही शाश्वती नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधेः– मा.अध्यक्ष महोदय, यांना कंत्राटवर लावता येईल. एजन्सीला देण्याची काही गरज नाही

श्री.उचके( अधिकारी):–मा. अध्यक्ष महोदय, उपायुक्त साहेबांचा स्पष्ट प्रस्ताव होता. चोवीस तासाकरिता त्यांची सेवा पाहिजे म्हणून हे केले आहे. प्रस्ताव पाठवायचा आहे नंतर स्थायी समितीपुढे सादर करण्यात येईल.

अध्यक्षः– सेक्युरिटी गार्ड लावण्याच्या वेळी असाच अनुभव आला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.अध्यक्ष महोदय, रिक्रुटमेंटच्या संदर्भात नवीन कायदयात काय तरतूद आहे.

श्री.कुंभारे(अति.उपायुक्त):—मा. अध्यक्ष महोदय, नवीन ॲक्टप्रमाणे जी काही तरतूद असेल त्याप्रमाणे करावे लागेल. नवीन रूल आणि बॉयलॉज तयार होईपर्यंत जुन्याप्रमाणे करता येईल.

अध्यक्षः— मा. सदस्योंने इस संदर्भ मे जो भावना रखी है, उसे मध्यनजर रखते हुये प्रशासन की ओर से कार्यवाही होनी चाहिये ।

**ठराव क्रमांक 234** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

उपनिगम आयुक्त
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर